# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

## देवळा-मालेगाव (जि.नाशिक) रस्त्यावरील मेशी फाटयाजवळ परिवहन महामंडळाची धुळे-कळवण बसला झालेला अपघात

**(१) ३०८५५ (१८-०६-२०२१). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा-मालेगाव (जि.नाशिक) रस्त्यावरील मेशी फाटयाजवळ एसटी महामंडळाची धुळे-कळवण बसचे टायर फुटून शेतातील खोल विहिरीत पडून झालेल्या भीषण अपघातात २० प्रवासी ठार तर ३३ प्रवासी जखमी झाल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अपघातातील मृत व जखमींना कोणती आर्थिक मदत करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२१) :** (१) सदरचा अपघात दि.२८.०१.२०२० रोजी झाला असून, सदरचा अपघात राज्य परिवहन बसचे टायर फुटल्याने झाला नाही. सदर अपघातात २६ व्यक्ती मृत पावले असून, ३५ व्यक्ती जखमी झाले आहेत.

(२) सदर अपघाताची चौकशी पोलिस विभाग व राज्य परिवहन महामंडळाद्वारे करण्यात आली असून, चौकशीत सदर अपघातास राज्य परिवहन बस चालक जबाबदार असल्याचे आढळून आले आहे. त्यांचे विरुध्द मृत्यु पश्चात देवळा पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या अपघातातील मृत व्यक्तींचे वारस व जखमी व्यक्तींना दि.२२.०६.२०२१ अखेर एकूण रु.१ कोटी ७२ लाख इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये PMPML ची बस सेवा सुरु करण्याबाबत

**(२) ४१६६३ (२५-०४-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत पुणे जिल्ह्यातील ८१७ गावांचा समावेश झाला असून त्यामध्ये दौंड तालुक्यातील ५१ गावांचा देखील समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअंतर्गत येणाऱ्या काही गावांमध्ये PMPML ची बस सेवा सुरु करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, दौंड तालुक्यातील उर्वरित गावांमध्ये देखील बस सेवा सुरु करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी पत्रव्यवहार केला आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, PMPML ची सेवा सुरु झाल्यामुळे अनेक गावातील राज्य परिवहन महामंडळाची शटल बस सेवा बंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त उर्वरित गावांमध्ये PMPML ची बस सेवा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत पुणे जिल्ह्यातील ८१४ गावांचा समावेश झाला असून त्यामध्ये दौंड तालुक्यातील ५१ गावांचा समावेश झाला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील प्रवाशांच्या मागणीनुसार काही भागात बससेवा सुरु करण्यात आली आहे. सदरील सेवेपोटी महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे संचलन तुटीची मागणी करण्यात आली आहे.

---

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील चिपळूणजवळील परशुराम घाटामध्ये दुर्घटनांप्रकरणी बजावण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीबाबत

**(३) ४४८८२ (२०-०९-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील चिपळूणजवळील परशुराम घाटामध्ये रस्ता चौपदरीकरणाचे काम सुरू असताना माहे जुलै २०२१ तसेच फेब्रुवारी २०२२ मध्ये झालेल्या दुर्घटनांप्रकरणी केंद्र शासनाच्या धोरणानुसार सदर कामावर देखरेख करण्याकरता नेमण्यात आलेला स्वतंत्र अभियंता व कंत्राटदार यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नोटीसीनुसार संबधीतांकडून खुलासा प्राप्त झाला आहे काय, त्यात कोणती कारणे नमूद करण्यात आली आहेत आणि त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (१०-११-२०२२) :** (१) होय.
(२) होय.

सदर नोटीसीनुसार दि.२२ जुलै व २३ जुलै २०२१ रोजीच्या घटनेबाबत केंद्र सरकारमार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंता यांनी त्यांचा अहवाल सादर केला आहे की, परशुराम घाटातील कि.मी.४१.५०० ते कि.मी.४२.४३२ या डिझाईन लांबीत आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आलेल्या होत्या व सदर दरड कोसळण्याची घटना ही अतिवृष्टीमुळे नैसर्गीक आपत्ती उद्भवल्यामुळे घडली होती.

तसेच कंत्राटदार मेसर्स कशेडी परशुराम हायवेज प्रा. लि. यांनी सदर घटनेबाबत खुलासा केला आहे की, परशुराम घाटातील कि.मी. ४१.५०० ते कि.मी. ४२.४३२ ही डिझाईन लांबी भूसंपादन मोबदला वाटपाबाबत वादामुळे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे हस्तांतरीत करण्यात आली नव्हती. या हस्तांतरण न झालेल्या लांबीमध्ये कि.मी. ४१.६५० ते ४१.६६० दरम्यान सदर दरड कोसळण्याची घटना घडली आहे. कंत्राटदार कंपनीमार्फत दि. २२.०७.२०२२ रोजी घडलेल्या दुर्घटनेपर्यंत सदर लांबीमध्ये कोणत्याही प्रकारचे चौपदरीकरणाचे काम करण्यात आले नव्हते. सदर लांबीमध्ये दि.२३.१२.२०२१ पासून पोलीस संरक्षण घेऊन प्रत्यक्ष काम सुरु करण्यात आले आहे. तसेच कोकण विभागामध्ये

झालेल्या अतिवृष्टीमध्ये रत्नागिरी जिल्हयातील प्रमुख नदया जसे की वाशिष्टी, जगबुडी या धोकादायक पातळी ओलांडून वाहत होत्या. तसेच दि.२२.०७.२०२१ दरम्यान चिपळुण तालुक्यामध्ये जवळ-जवळ ४५० मी.मी. पाऊस पडल्याने सदर दरड कोसळण्याची दुर्घटना नैसर्गिक आपत्तीमुळे घडली आहे. सदर घटनेतील बाधितांना शासकीय निकषानुसार सानूग्रह अनुदान व मुख्यमंत्री सहाय्यता निधीनुसार मदत करण्यात आलेली आहे. तसेच पडझड झालेल्या घरांसाठी शासकीय निकषानुसार नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

फेब्रुवारी २०२२ मध्ये झालेल्या दुर्घटनेप्रकरण संबंधित स्वतंत्र अभियंता व कंत्राटदार यांना बजावलेल्या कारणे दाखवा नोटीशीस अनुसरुन कंत्राटदाराकडून खुलासा करण्यात आला आहे की, " कंत्राटदारामार्फत परशुराम घाटातील चौपदरीकरणाच्या कामादरम्यान करारनाम्यानुसार आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. दि.०८ फेब्रुवारी,२०२२ रोजी घडलेली दरड कोसळण्याची घटना ही अनपेक्षीतपणे व अपघाताने घडली होती. त्यासाठी ठेकेदाराने कोणताही हलगर्जीपणा हा ठरवुन केलेला नाही. तसेच सदर घटनेतील अपघातग्रस्त मृत व्यक्तीस,कामगारासाठी असलेल्या गट विमा योजनेतंर्गत नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

तसेच स्वतंत्र अभियंता यांनी याबाबत खुलासा केला आहे की, "रस्ते सुरक्षा उपाययोजनांतर्गत त्यांनी वेळोवेळी कंत्राटदारास सदर बाबतीत सुचना देऊन परशुराम घाटामध्ये आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपाययोजना अवलंबून काम करणेबाबत कळविले आहे."

वरील खुलासा प्राप्त झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत कंत्राटदाराच्या देयकामधून दंडात्मक कार्यवाहीसाठी सुमारे रु.२० लक्ष व स्वतंत्र अभियंता यांचे देयकामधून सुमारे रु.०५ लक्ष रोखून ठेवण्यात आलेले आहेत.

तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत सदर कंत्राटदार व स्वतंत्र अभियंता यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना व काळजी घेणेबाबत तसेच संबंधित कोणत्याही दुर्घटना होणार नाही याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कासा (जि.पालघर) येथे चारोटी नाका ते महालक्ष्मी मंदिर या सेवा रस्त्याचे काम अपुर्ण असल्याबाबत**

**(४) ४५३४९ (२०-०९-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासा (जि.पालघर) येथे महालक्ष्मी यात्रेदरम्यान मंदिरापासून महामार्गावर येणा-या वाहनांचा गंभीर अपघात होऊन अनेक जण गंभीर जखमी झाल्याने चारोटी नाका ते महालक्ष्मी मंदिर असा दोन्ही बाजूने स्वतंत्र सेवा रस्त्याची मागणी स्थानिकांनी आंदोलन करुन केली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार आयआरबी कंपनीने रस्त्याचे काम करण्याची हमी दिली होती परंतु काम सुरु होऊन पाच वर्षे उलटूनही रस्त्याचे काम अपुर्णावस्थेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपुर्ण कामामुळे महालक्ष्मी मंदिरात येणा-या भाविकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असून, सदर रस्त्याचे काम विहित कालावधीत पुर्ण न करणा-या आयआरबी कंपनी विरोधात शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(४) असल्यास, त्याचबरोबर चारोटी नाका ते महालक्ष्मी मंदिर हा रस्ता तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे आहे. महालक्ष्मी मंदिर ते चारोटी सेवा रस्त्याची मागणी करण्यात आली होती.

(२) पालघर जिल्हयातील डहाणू तालुक्यातील कासा येथील चारोटी नाका ते महालक्ष्मी मंदीर हया रस्त्याचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सवलत करार नाम्यानुसार या ठिकाणी प्रस्तावित सेवा रस्त्यापैकी कि.मी.४१४.६२० ते कि.मी. ४१४.९१० दरम्यान वन जमिन असल्याने येथील सेवा रस्ता कंत्राटदाराच्या कार्यकक्षेतून वगळण्यात आला.
(३) कंत्राटदाराने कि.मी.४१६.६२० ते चारोटीच्या सेवा रस्त्याचे काम सुरु केले. तथापि, भूसंपादनाच्या समस्यांमुळे चारोटी पर्यंत अखंड सेवा रस्ता (service road) पूर्ण करता आला नाही.
(४) मे.आय.आर.बी. चा सवलत/कंत्राट कालावधी २२.०५.२०२२ रोजी संपुष्टात आल्यामुळे सदर प्रस्तावित सेवा रस्त्यातील उर्वरित काम सध्याच्या वस्तुस्थितीनुसार पडताळणी करुन नव्याने प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

---

**नागपूर–मुंबई समृध्दी महामार्गाचे कंत्राट हैदराबाद येथील मेघा इंजिनियरिंग एड इंफ्रास्ट्रक्चर या कंपनीला देण्यात आलेले काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(५) ४६०९२ (२५-०९-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर–मुंबई समृध्दी महामार्गाचे चरण-१ चे काम हिंगणा ता.मौजा शिवमडळापासून ते खडकी आमगाव पर्यंत या ३१ किमी अंतराच्या कामाचा कंत्राट हैदराबाद येथील मेघा इंजिनियरिंग एड इंफ्रास्ट्रक्चर कंपनी देण्यात आले असून मोठया प्रमाणात निकृष्ट दर्जाचे काम सुरु असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामात कंत्राटदाराकडून मोठया प्रमाणात दर्जाहीन काम होत असून संबधीत अधिका-याचे पुर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सखोल चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने सदर प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग बांधकाम पॅकेज क्रमांक १ चे काम ईपीसी तत्वावर मे. मेघा इंजिनियरींग ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. हैद्राबाद यांना देण्यात आले आहे. सदर प्रकल्पाच्या बांधकामाकरीता "प्राधिकारी अभियंता" म्हणून जबाबदारी पार पाडण्याकरीता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून मे. के ॲण्ड जे प्रोजेक्टस् प्रा. लि. नागपूर इन जेव्ही योगमा इंजिनिअरींग कंपनी प्रा. लि. यांची प्राधिकारी अभियंता म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
समृध्दी महामार्गाचे बांधकाम ईपीसी तत्वावर असून त्यानुसार बांधकामाची गुणवत्ता राखण्याची संपुर्ण जबाबदारी ही ईपीसी कंत्राटदाराची असते व त्यावर प्राधिकारी अभियंता यांचे नियंत्रण असते. तसेच प्रकल्पाच्या ४ वर्षाच्या दोष निवारण कालावधीत कोणत्याही प्रकारची त्रृटी आढळल्यास सदर त्रृटी स्वखर्चाने दुर करण्याची संपुर्ण जबाबदारी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार ईपीसी कंत्राटदाराची असते.

प्राधिकारी अभियंता हे बांधकाम साहित्याची तपासणी व मंजूरी, संकल्पने तपासणी, दैनंदिन पर्यवेक्षण, गुणवत्ता तपासणी, मोजमापांची नोंद व देयके तयार करुन भुगतानाकरीता प्रमाणित करणे, झालेल्या कामाची तपासणी करुन त्यातील त्रृटी ईपीसी कंत्राटदाराच्या निदर्शनास आणून देवून त्याची दुरुस्ती करुन घेणे इ. करिता संपुर्णपणे जबाबदार असतात. सदर बांधकाम हे दिनांक-०१.०१.२०१९ रोजी ईपीसी कंत्राटदारामार्फत सुरु करण्यात आले असून कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार व प्रचलित MORT&H व IRC मानके तसेच स्पेसीफीकेशननुसार व प्राधिकारी अभियंता यांच्या पर्यवेक्षणात महामार्गाचे बांधकाम करण्यात आले आहे.

प्रकल्पाच्या बांधकामात एकुण ६ मार्गिकांचा ३१ कि.मी. लांबीचा रस्ता तसेच विविध आकारांच्या १४० संरचना (Structures)च्या बांधकामांचा प्रामुख्याने समावेश होता. सदर बांधकामाच्या दरम्यान प्राधिकारी अभियंता यांच्या चमुतर्फे वेळोवेळी कामाची तपासणी करण्यात येऊन आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यात येत होत्या. कामात त्रृटी आढळल्यास प्राधिकारी अभियंता यांच्या तर्फे कंत्राटदारास Non Conformity Report देण्यात येत होते. त्यानुसार

आवश्यक त्या सुधारणा करुन प्राधिकारी अभियंता यांच्या मार्फत पुर्न:तपासणी करण्यात येऊन झालेल्या कामाचे Non Conformity Report मधील उपस्थित मुद्यांचे निराकरण झाल्यावरच पुढील काम करणे कंत्राटदारास बंधनकारक होते. अशाप्रकारे पाहणी व त्यानंतर मंजूरी प्राप्त झाल्यानंतरच त्या कामाचे प्राधिकारी अभियंता यांच्यामार्फत मोजमाप करण्यात येऊन त्याचे देयक प्रमाणित करुन महामंडळास सादर करण्यात येत होते. ईपीसी कंत्राटदाराची काम पुर्ण करण्याची नियत तारीख २९.०६.२०२१ होती. तथापि, कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे कंत्राटदास १ वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार प्राधिकारी अभियंता यांच्या शिफारशीस अनुसरून कंत्राटदारास दिनांक ३०.०६.२०२२ रोजी Provisional Completion Certificate (PCC) प्रदान करण्यात आले आहे. सदर PCC प्रदान करण्यापुर्वी कंत्राटाच्या Schedule-K नुसार संपूर्ण प्रकल्पाच्या आवश्यक त्या सर्व चाचण्या करण्यात येऊन पुर्ण करण्यात आलेल्या कामातील प्रत्येक बाबींची सखोल तपासणी करण्यात येऊन सदर काम MORT & H व IRC च्या मानकानुसार गुणवत्तापुर्ण असल्याचे प्राधिकारी अभियंता यांनी प्रमाणित केले आहे.

(२) प्रश्न उद् भवत नाही.

(३) प्रश्न उद् भवत नाही.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

---

**एम.एस.आर.डी.सी. कल्याण प. येथील पत्री पूल ते दुर्गाडी किल्ला चौकाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(६) ४६७४८ (२५-०९-२०२२). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.एस.आर.डी.सी. कल्याण (प) येथील पत्री पूल ते दुर्गाडी किल्ला चौक या रस्त्याच्या कामात प्रचंड प्रमाणात अनियमिता झाली असून सदर रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे नागरिकांना प्रचंड मनस्ताप झाल्याचे दिनांक २० मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची तातडीने चौकशी करून संबधित ठेकदारावर कारवाई करून सदर निकृष्ट दर्जाचे काम तातडीने थांबविण्याबाबत स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी मुख्य अभियंता एम.एस.आर.डी.सी.व आयुक्त म न पा यांना दिनांक २९ मार्च २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एम.एस.आर.डी.सी. कल्याण (प) येथील पत्री पूल ते दुर्गाडी किल्ला चौकच्या कामाची निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. रविंद्र चव्हाण (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे

(३) सन २०२२ चा पावसाळा लक्षात घेता वाहतूक विभागाने रस्त्याचे काम करण्यास मनाई केली असल्याने कल्याण (प) येथील पत्री पूल ते दुर्गाडी किल्ला चौक या लांबीपैकी १.२ कि.मी लांबीतील काम अद्याप पूर्ण झालेले नाही. सदर काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

तथापि, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील प्रगतीपथावर असलेल्या रस्त्याच्या कामाचा दर्जा तपासणीसाठी मे. वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI) यांची दि.१८.०१.२०२१ अन्वये नियुक्ती केली आहे. सदर रस्त्याच्या क्राँकीटीकरणाच्या कामाची गुणवत्ता व दर्जा तपासण्यासाठी तसेच केलेल्या कामाचे त्रयस्थ शासकीय संस्थेमार्फत ऑडीट करण्यासाठी नेमण्यात आलेल्या वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था, माटूंगा, मुंबई (VJTI) यांनी भिवंडी कल्याण शिळफाटा रस्त्याच्या क्राँकीटीकरणाच्या कामाच्या २१ कि.मी लांबीपैकी १० कि.मी लांबीचे स्ट्रक्चरल ऑडीट केले असून त्यांचा स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट महामंडळास प्राप्त झालेला आहे. सदर ऑडीट रिपोर्टप्रमाणे, १० कि.मी लांबीत एकूण सुमारे १३,३२० पॅनल बनविण्यात आले आहेत. त्यापैकी ३० पॅनल बदली करणे आवश्यक असून ६४ पॅनलमध्ये लहान तडे गेल्याचे आढळून आले आहेत व ते त्वरीत सुधारण्याची शिफारस VJTI यांनी केली आहे.

त्यानुसार महामंडळाने पत्र क्र. ५२०८ दिनांक २०.०९.२०२१ अन्वये कंत्राटदारास सुचना दिलेल्या असून ३० पॅनल पैकी १९ पॅनल कंत्राटदाराने स्वखर्चाने बदली केले असून उर्वरीत पॅनल्स बदलण्याची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-मुंबई महामार्गावरील कामशेत उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(७) ४७६३१ (२१-०९-२०२२). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामशेत (ता.मावळ, जि.पुणे) येथील पुणे-मुंबई महामार्गावरील उड्डाणपूलाचे काम अद्याप अपूर्णावस्थेत असल्याचे माहे मे ,२०२२ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही वर्षापासून अधिक काळ हा पूल तयार होण्यास वेळ लागला असून या पुलाच्या उतारावर कठडे बसविण्याचे काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, शेजारील दोन्ही बाजूच्या रस्त्यांची अतिशय दुरवस्था झालेली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले असल्याने खड्ड्यांमध्ये पाणी साचून वाहन चालकांना तसेच पादचाऱ्यांना ही नाहक त्रास सहन करावा लागत आहे तसेच उड्डाणपुलावर दिव्यांची सोय नसल्याने वाहनचालकांना पुलाचा अंदाज येत नाही त्यामुळे छोटे-मोठे अपघात होऊन जीवित हानी होऊ शकते, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू पुलाचे अर्धवट काम, सेवा रस्ते, लाईटचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
सदरहु उड्डाणपुलाचे काम पुर्ण झाले असुन वाहतुक सुरु आहे. परंतु कामशेत येथे भुयारी मार्गाचे Finishing व किरकोळ काम शिल्लक राहीले असून उर्वरित काम पुर्ण करण्याकरीता मे. जयहिंद रोड बिल्डर्स यांची नियुक्ती दिनांक २५ मे २०२२ रोजी करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे नाही.
सदरच्या कामात उड्डाणपुलावर व सेवा रस्त्यावर दिव्यांची तरतूद नाही. परंतु वाहतुकदाराच्या सोयी साठी रस्त्यावर पट्टे मारण्यात आले आहेत व रिफ्लेक्टीव्ह टेप हे पुलाच्या कठडयावर लावण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद् भवत नाही.

---

## राज्यातील प्राथमिक शाळांच्या सकाळच्या सत्रातील वेळा बदलण्याबाबत

**(८) ४९६५३ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक शाळांच्या सकाळच्या सत्रातील कामकाजाच्या वेळा बदलण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावातील बाबींचा सर्वसाधारण तपशील काय आहे,
(३) असल्यास, प्रस्तावास अंतिमत: मान्यता देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) यासंदर्भात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत शाळांची वेळ बदलण्याविषयी अभ्यास करण्यात आला व याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी सादर केलेल्या अहवालास अनुसरुन राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या ज्या शाळांची पुर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरण्याची वेळ सकाळी ९ वाजताच्या अगोदरची आहे, त्या शाळांनी नविन येणारे शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ पासून पुर्व प्राथमिक ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग भरवण्याबाबतची वेळ सकाळी ९ किंवा ९ नंतर ठेवण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ०८.०२.२०२४ अन्वये सुचना करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यात गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(९) ५२३१९ (१८-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, तत्कालीन अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, आणि भोकर येथील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्याकरीता सुमारे ६० कोटी रुपयांचे खोटे व बनावट अंदाजपत्रक तयार केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्यावर लाचलुचपच प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करून कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (नायगाव) यांनी मा.उप मुख्यमंत्री यांना दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीनुसार संबंधीत अधिका-यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरहू दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (२७-०४-२०२३) :** (१) नाही.
(२) व (३) असे निवेदन प्राप्त झाले असून, अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्यामार्फत सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे. चौकशी अहवालानुसार, सदर प्रकरणी अनियमितता झाल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वीट भट्टीवर काम करीत असलेली आदिवासी मुले शिक्षणापासून वंचित असल्याबाबत

**(१०) ५८८४५ (२४-०४-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील शहापूर तालुक्यातील वीट भट्टीवर काम करीत असलेली आदिवासी मुले शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळाबाह्य मुले शिक्षणापासून वंचित राहू नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २३ जून, २०२२ नुसार ०३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य व स्थलांतरीत मुलांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात दाखल करण्यासाठी “मिशन झिरो ड्रॉप आऊट” या नावाने दिनांक ०५ जुलै, २०२२ ते दिनांक २० जुलै, २०२२ या कालावधीमध्ये राज्यात मोहिम राबविण्यात आली होती. सदर मोहिमेत ठाणे जिल्ह्यात एकुण १२८० बालके शाळाबाह्य आढळून आली आहेत. सदर आढळून आलेली सर्व शाळाबाह्य बालके शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आली आहेत.

(२) शाळा बाह्य मुला-मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हक्क कायदा (आरटीई), समग्र शिक्षण योजना, बेटी बचाव-बेटी पढाव व मध्यान्ह भोजन यासारख्या विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. सदर योजनांमुळे शाळाबाह्य मुलांचे प्रमाण कमी होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कसारा (जि.ठाणे) येथील रस्त्याची दूरुस्ती करणे व रस्त्याला संरक्षक कठडे बांधण्याबाबत

**(११) ५९०८० (२५-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कसारा कार्यक्षेत्रातील रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याने वाहतूक कोंडी होत असून संरक्षक कठडे नसल्याने वाहने दरीत कोसळून अपघात होऊन मनुष्यहानी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) व (२) कसारा क्षेत्रात राज्यमार्ग ७८ विहगाव ते रा.म. क्र.३ व कसारा ते वशाला डोलखांब या रस्त्यांचे नुतनीकरणाचे काम हायब्रीड अन्युईटी योजनेअंतर्गत करण्यात आले आहे. प्र.जि.मा. क्र.५२ घाटंदेवे ते विहगाव या रस्त्यांचे नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ५३ या रस्त्याचे काम OPMRC प्रकल्पात समाविष्ठ असून निविदा प्रक्रीया पूर्ण करुन, सदरचे काम लवकरच हाती घेण्याचे नियोजन आहे.

सदर रस्त्यावरील खड्डे वेळोवेळी भरुन रस्ता वाहतुकीकरीता सुरळीतआहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे खडकवास प्रकल्पातून शहरासाठी उपलब्ध होणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत

**(१२) ६०१५१ (०३-०५-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे खडकवासल प्रकल्पातून शहरासाठी उपलब्ध होणाऱ्या पाणी पुरवठ्यापैकी दरवर्षी आठ अब्ज घनफुट (टीएमसी) पाणी गळती होत असल्याची बाब कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत समोर आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढे पाणी गळती कशी होते यावर शासन तज्ञ समीती नेमणार आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणी गळती रोखण्यासाठी बंद पाइपलाइनद्वारे पाणी पुरवठा, समान पाणी पुरवठा योजना, पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम पुर्ण करणे, भामा आसखेडमधून क्षमतेनुसार पाणी उचलणे या संदर्भात उपाययोजना करण्यात येणार आहेत किंवा कसे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरचा आठ अब्ज घनफूट हा फरक अवैध पाणीवापर, जादा पाणीवापर व गळती असा एकत्रितपणे असून त्यासाठी पुणे महानगरपालिकामार्फत समान पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आलेली आहे.

(२) व (३) समान पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत पुणे शहराचे एकूण १४१ वॉटर सप्लाय झोनमध्ये विभागणी करण्यात आलेली असून पाण्याचे टाक्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. ८२ साठवण टाक्यापैकी ४३ एवढया पाण्याच्या टाक्या पूर्ण करणेत आलेल्या आहेत. तसेच काही झोनमध्ये वॉटर ऑडीटची कामे हाती घेण्यात आलेली असून वॉटर ऑडीट यामध्ये जलवाहीनीवरील व नळजोड कनेक्शनची गळती शोध काम करुन ते बंद करणे व टप्प्याटप्याने पाणी गळती २० % पर्यंत कमी करण्याचे उद्दीष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने प्रकल्पीय कामे सरु आहेत. वॉटर ऑडीटची कामे पूर्ण झालेनंतर पाणीगळती कमी करणे शक्य होईल. तसेच भामा आसखेड धरणामधून दैनंदिन २०० एम.एल.डी. पाणी उचलण्याची क्षमता असून सध्यस्थितीत १६० एम.एल.डी. पाणी उचलण्यात येत आहे. भविष्यात क्षमतेनुसार पाणी उचलावे लागणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई –अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील जनावरांमुळे होत असलेल्या अपघाताबाबत**

**(१३) ६०९५२ (२५-०४-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील महालक्ष्मी मंदिर ते मेंढवन खिंड या परिसरात मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या अपघातांच्या संख्येत वाढ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टोल कंपनी याबाबत तातडीने सुरक्षा उपाय योजना करणार आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (२१-०७-२०२३) :** (१) मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील महालक्ष्मी मंदिर ते मेंढवन खिंड हा महामार्ग केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

पोलिस अहवालानुसार जानेवारी २०२३ ते आजपावेतो सदर महामार्गावर मोकाट जनावरांमुळे होणा-या अपघातांची संख्या निरंक आहे.

(२) सदर बाब टोल कंपनीच्या अखत्यारीत येत नसुन या महामार्गावर प्राधिकरणामार्फत प्राणी व वाहनांना महामार्ग ओलांडण्यासाठी ठिकठिकाणी भूयारी मार्ग दिलेले आहेत व ते वापरात आहेत.

मोकाट जनावरांमुळे अपघात होऊ नये यासाठी सदर महामार्गावर २४ तास पेट्रोलींग करीता एक वाहन गस्त घालत असुन रोडवर मोकाट जनावर रस्त्याच्या बाजूला हाकलुन लावण्यात येतात, महामार्गावरील डीव्हायडरवर गवत खाण्यासाठी जनावरे येऊ नयेत याकरीता वेळोवेळी गवत कापुन काढले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नंदुरबार जिल्ह्यातील खेतीया-शहादा-प्रकाशा-विसरवाडी महामार्गावरील तापी नदीवरील समांतर पुलाचे बांधकामाबाबत

**(१४) ६२०४६ (२५-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेतीया-शहादा-प्रकाशा-विसरवाडी महामार्गावरील तापी नदीवरील समांतर पुलाचे बांधकाम दोन ते अडीच वर्षांपासून प्रलंबित असून तसेच रस्ता दुरुस्तीचे काम देखील संथगतीने होत असल्यामुळे या महामार्गावरील अपघाताचे प्रमाण वाढून अनेकांना जीव गमवावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तापी नदीवरील समांतर पुलाचे बांधकाम व या महामार्गावरील चौपदरीकरणाचे काम पुर्ण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०५-०७-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद् भवत नाही.

(३) सदर प्रकल्पास खालील कारणांमुळे विलंब झाला आहे.

१) कोवीड-१९ संसर्गच्या आजाराच्या साथीमुळे शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार लॉकडाऊन असल्याने काही कालावधीसाठी काम बंद होते.

२) उकई सोनगड प्रकल्प गुजरात या धरणाचा पाण्याचा फुगवटा जवळपास नऊ महिने प्रकाशा पुलाजवळ असतो त्यामुळे तापी नदीवरील पुलाचे काम करणेसाठी वर्षातुन फक्त तीन महिन्याचा कालावधी मिळतो त्यामुळे तापी नदीवरील पुलाचे कामास विलंब झाला आहे. सद्य:स्थितीत तापी नदीवरील पुलाचे काम प्रगतीत आहे.

३) सदर राष्ट्रीय महामार्गाचे कि.मी.५०/२०० ते ९८/८०० (कोलदे ते खेतिया) या एकुण ४८.६०० कि.मी. लांबी पैकी ४४.९०० कि.मी. लांबीचे काम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत ३.७० कि.मी. मधील काम भूसंपादन प्रक्रियेमुळे व स्थानिक शेतकरी यांनी केलेल्या विरोधामुळे बंद होते. परंतु सदर लांबीत भुधारकांना भुसंपादनाचा मोबदला वाटप करण्यात आल्याने सदर लांबीतील काम सुरु करण्यात आलेले आहे.

४) स्थानिक शेतकरी यांनी भूसंपादनाबाबत न्यायालयात दाखल केलेले दावे यामुळे कि.मी. ५६/७०० ते ५६/९००, ६६/६२० ते ६६/९००, ५८/४०० ते ५८/६०० व ५८/७०० ते ५८/९०० या लाबींत काम बंद होते. सदर लांबीत न्यायालयीन स्थगिती उठल्यानंतर न्यायालयीन आदेशान्वये काम पुर्ण करण्यात आले आहे.

---

## पुणे येथील कात्रज-कोंडवा रस्त्याच्या प्रलंबित कामाबाबत

**(१५) ६५१७२ (३०-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील कात्रज-कोंडवा या ८४ फुट रुंदीच्या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याने या रस्त्यावर वाहतुकीची प्रचंड कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रस्त्याचे रुंदीकरण व इतर प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) अशंत: खरे आहे.

कात्रज कोंढवा या ८४ मी. रुंद रस्त्याच्या ताब्याची कार्यवाही सुरु असल्याने पुर्ण रस्ता रुंदी झालेली नाही. त्यामुळे काही प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे.

सदयस्थितीत शत्रुंजय मंदिर चौक ते खडी मशीन चौकापर्यंत पर्यायी रस्त्याचे विकसन करुन सदर ठिकाणी एकेरी वाहतुक करण्यात आलेली आहे. तसेच कात्रज कोंढवा रस्त्यावर वाहतुकीचे नियंत्रण करणेसाठी ५० ट्रॅफिक वॉर्डनची दररोजसाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. याशिवाय शक्य त्या ठिकाणी अस्तित्वातील रस्त्याची रुंदी वाढविण्यात आलेली आहे.

(२) रस्ता विकसनासाठी रस्ता रुंदी क्षेत्रासाठी जागा मालकांनी मोबदल्यापोटी TDR /FSI न घेता रोख रक्कमेची मागणी केल्यामुळे पुर्ण रस्ता रुंदीची (८४ मी. रुंद) जागा उपलब्ध झालेली नाही .रस्ता विकसनासाठीची जागा ताब्यात घेणेसाठी कराव्या लागणा-या भूसंपादनासाठी लागणा-या निधी पैकी ५० % भुसंपादन निधी र.रू.१३९ कोटी शासनाकडून मंजुर करण्यात आलेली असून प्रकरणी भुसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे .

तसेच निविदेद्वारे रस्ता विकसनाचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून जात व वर्ण व्यवस्था शिकवणारी माहिती वगळण्याबाबत**

**(१६) ६५४३७ (२५-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून जात व वर्ण व्यवस्था शिकवणारी माहिती वगळण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास वैद्यकीय शिक्षण यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून “पुसवंत” विधी वगळणेबाबत अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना लेखी पत्र दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून जात व वर्ण व्यवस्था शिकवणारी माहिती वगळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (३०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पुंसवन विधी यासंबंधीचा आयुर्वेद अभ्यासक्रम हा भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांचेमार्फत विहित करण्यात येत असून सदर अभ्यासक्रमात बदल/सुधारणा करण्याची बाब भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांच्या अखत्यारीतील आहे.

सदर बाब विचारात घेऊन पदवी/पदव्युत्तर आयुर्वेद अभ्यासक्रमातील पुंसवन विधीचा पुनर्विचार करणेबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग यांना विनंती करण्यात आली होती. तथापि, भारतीय चिकित्सा पध्दती

राष्ट्रीय आयोग यांनी पुंसवन विधीबाबत संहितांमध्ये उल्लेख असल्याचे नमूद करून आयुर्वेद पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमातून सदर अभ्यासक्रमाचा भाग वगळण्यास असहमती दर्शविलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अंगणवाडया प्राथमिक शाळांना जोडण्यात येणार असल्याबाबत

**(१७) ६५७०१ (२८-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नविन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य शिक्षण व प्रशिक्षण परिषदेचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली कृती दलाची स्थापना शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकुण १ लाख १० हजार अंगणवाडया असून ४३ हजार अंगणवाडया प्राथमिक शाळांमध्ये भरत असल्यामुळे तेथील मुलांना फक्त पोषण आहार दिला जातो व त्यांचे लसीकरण केले जाते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाचे धडेही शिकविले जाणार असल्याने अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षणही देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (२८-०६-२०२४) :** (१) आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० ची अंमलबजावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या कार्यांबाबत समिती दिनांक २४.०६.२०२२ च्या शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आली आहे.

(२) राज्यात एकूण १ लाख १० हजार अंगणवाड्या असून पैकी ४३ हजार अंगणवाड्या प्राथमिक शाळांच्या परिसरात भरतात. राज्यातील सर्व अंगणवाड्या एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या अंतर्गत येत असून या विभागामार्फत देय असलेल्या पुरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्यतपासणी, संदर्भ सेवा, आरोग्य व पोषण शिक्षण, पूर्व प्राथमिक शिक्षण या सहा सेवा सर्व अंगणवाडयांमधील बालकांना दिल्या जातात.

(३) पूर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण (ECCE) धोरणाबाबतचा शासन निर्णय महिला व वालविकास विभागाने दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी निर्गमित केला आहे. या शासन निर्णयातील तरतूदीनुसार राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या प्रशिक्षणाशी संबंधित कार्यवाही ही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या समन्वयाने करण्यात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सन २०२२-२३ पासून टप्याटप्याने सर्वच अंगणवाडी सेविकांना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत सेवांतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्हयातील ग्रामीण व इतर मार्गांची दर्जोन्नती करण्याबाबत

**(१८) ६७४६२ (३०-०८-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील (१) रा.म.ता.६६ ते वडखळ बोरी शिर्की ते बोर्वे मसद (खु) ते शिर्की चाळ नं.२ (२) दादर बंदर प्रजिमा २७ ते सोनखार उर्णोली ई.जि.मा.४४ (३) पेण अंतोरे कणे बोर्झे इ.जि.मा ५१ (४) रा.म.मा.१६६ डी ते तरणखोप रामराज धवनसर (५) पेण-बोरगाव गावठयाची वाडी-विराणी-धनगर माळ-बंगलावाडी-देवूळवाडी-वेताळपटटी ते महलमिऱ्या डोंगर (६) रा.म.मा.१६६ डी ते हेटवणे कॉलनी म्हैसकोंड (७) रा.म.मा.१६६ डी ते सापोली तळवली हेटवएे नवीन वसाहत सातेरीवाडी (८) प्र.जि.मा.२४ ते कळद जिर्णे कातकरवाडी ठाकूरवाडी (९) कोलेटी वरप रेवोळे जांभोशी (१०) रा.म.मा. ६६ ते उंबर्डे पिंपळगाव धोंडपाडा (११) रा.म.मा. १६६ डी ते वरसई आष्टे मोहिली इनाम (जांभळवाडी) या ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांचे प्रमुख जिल्हा मार्गात दर्जोन्नत करणेकरीता मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० जून, २०२२ व १८ ऑगस्ट, २०२२ अन्वये लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण (०७-१२-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे .
(२) रस्त्याच्या दर्जोन्नती करिता शासन परिपत्रक क्र . संकीर्ण -२०१४/प्र. क्र. ६५/नियो -२, दि. २०/०७/२०१६ मध्ये नमूद निकषाच्या अधिन राहून उचित कार्यवाही करणेचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही .

---

**राज्यातील ऊस तोडणी कामगारांच्या मुलांच्या वस्तीगृहासाठी अनुदान वाढवून देण्याबाबत**

**(१९) ६७९२० (२८-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऊस तोडणीसाठी बाहेर राज्यात स्थलांतरीत होणाऱ्या मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची दुरवस्था होऊ नये यासाठी शासनाने हंगामी वसतिगृह सुरु केले असून सदर वसतिगृहात मुलांच्या दोन वेळेच्या जेवणासाठी दिले जाणारे प्रत्येकी ४७ रुपये अनुदान कोव्हीड नंतर कमी करून ३३ रुपये करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतिगृहामधील विद्यार्थ्यांना भोजनासाठी शिवभोजन थाळीच्या धर्तीवर अनुदान वाढवून देणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (केज विधानसभा) यांनी शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक ०६ मार्च,२०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

सन २०२१-२२ वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक तयार करण्यापुर्वी केंद्र शासनाकडील पत्र दिनांक ०६.०८.२०२१ अन्वये समग्र शिक्षा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमासंदर्भात आर्थिक बाबी निश्चित केलेल्या आहेत. त्यानुसारच अंदाजपत्रकामध्ये मागणी करणे आवश्यक असल्यामुळे सदर योजना ज्या लेखाशिर्षांतर्गत समाविष्ट आहे त्या, Special Training for Out of School Children अंतर्गत प्रति मूल प्रति वर्ष रू.६०००/- प्रमाणे अनिवासी अंतर्गत मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली. त्यानुसार केंद्र शासनाकडील सन २०२१-२२ च्या मंजूर इतिवृत्त दिनांक ०९.०८.२०२१ अन्वये प्रति लाभार्थी रक्कम रू.६०००/- नुसार प्रति दिवस रक्कम रु.३३/- प्रति मूल अशी एकूण ५६,६१२ बालकांसाठी रक्कम रु.३३९६.७२ लाख इतकी मंजूर करण्यात आली.

एकंदरित सदर प्रकरणी केंद्र शासनाकडील मंजूर निकषाच्या आधारेच समग्र शिक्षा अंतर्गत मागणी करण्यात आलेली आहे.
(२) सदर निवेदनाबाबत कार्यासनात शोध घेतला असता, अशा प्रकारचे निवेदन आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील परीक्षा मंडळांच्या शाळांमध्ये सन २०२३-२०२४ पासून पुढील तीन वर्षापर्यंत इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचे मराठी विषयांचे मूल्यांकन करताना श्रेणी स्वरूपात करण्याबाबत**

**(२०) ६८८७५ (०१-०९-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), अ‍ॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परीक्षा मंडळांच्या शाळांमध्ये सन २०२३-२०२४ पासून पुढील तीन वर्षापर्यंत इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचे मराठी विषयांचे मूल्यांकन करताना श्रेणी स्वरूपात केले जावे असा शासन निर्णय करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मूल्यांकनाचा समावेश या परीक्षा मंडळाच्या इतर विषयांच्या एकत्रित मूल्यांकनात करू नये असा निर्णयही घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठी भाषा शिकविण्याचे सर्व शाळांवर कायदेशीर बंधन असताना असा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या निर्णयामुळे मराठी भाषेचे महत्त्व कमी होणार असल्याने सदरील निर्णयासंदर्भात शासन पुनर्विचार करणेसंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर (१०-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

राज्य मंडळाच्या शाळांव्यतिरिक्त इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये सन २०२३-२४ पासून फक्त पुढील तीन वर्षापर्यंत इयत्ता ८, ९ व १० वी वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मराठी विषयाचे मुल्यांकन करतांना श्रेणी स्वरुपात (अ, ब, क, ड) करण्याबाबतचा निर्णय दिनांक १९ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) कोविड-१९ मुळे सदर कालावधीत नियमित शाळा सुरु राहण्यास अनेक अडचणी आलेल्या होत्या. त्यामुळे राज्य अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त इतर परीक्षा मंडळाच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या अध्ययनामध्ये व पर्यायाने संपादणूकीमध्ये अडचणी आल्याचे लोकप्रतिनिधी, मुख्याध्यापक व पालक यांनी समक्ष भेटून निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले होते. यामुळे राज्य मंडळाच्या शाळांव्यतिरिक्त इतर परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये सन २०२३-२४ पासून फक्त पुढील तीन वर्षापर्यंत इयत्ता ८, ९ व १० वी वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे मराठी विषयाचे मुल्यांकन करतांना श्रेणी स्वरुपात (अ, ब, क, ड) करण्याबाबतचा निर्णय दिनांक १९ एप्रिल, २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे. सदर निर्णय फक्त एकाच बॅचला लागू आहे.

राज्यातील सर्व परीक्षा मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव-मालेगांव मार्गावरील पुलाची रुंदी वाढविण्याबाबत

**(२१) ७०४४० (३१-०८-२०२३). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव-मालेगांव मार्गाचे काम ॲन्युटी मधून करण्यात आले असून सदर रस्त्याची रुंदी दहा मीटर असतांना याच रस्त्यावर नांदगाव तालुक्यातील पांझण नदीवर तीस वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या पुलाची रुंदी सहा ते सात मिटर असल्याने पुलावर अनेकदा अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ता मोठा आणि पूल छोटा झाल्यामुळे याठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघात होउन जीवित हानी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात वांरवार संबंधित विभागाकडे तक्रारी करुनही संबंधित अधिकाऱ्यांकडून सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीकोनातून कोणतेही दिशादर्शक फलक अथवा सुरक्षेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन नांदगाव-मालेगाव मार्गावरील अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी काय निर्णयात्मक कार्यवाही वा उपायोजना केल्या आहेत वा करण्यात येणार आहेत?

**श्री. रविंद्र चव्हाण (०४-१२-२०२३) :** (१) नांदगाव मालेगाव रस्त्याचे कि.मी.२७/१०० ते ६६/०० लांबीमध्ये १० मीटर रुंदीकरणाचे काम हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत निविदेतील तरतुदीनुसार पूर्ण करण्यात आले आहे. सा क्र १९/६०० वरील पांझन नदी वरील पुलाचे सद्य:स्थितीत ६ मीटर लांबीचे १२ गाळे व ७.५० मीटर इतकी रुंदी आहे.
(२) नाही.
(३) सदर पुलाच्या ठिकाणी व संपूर्ण रस्त्याच्या लांबीत रोडसाइड फर्निचर जसे की, बंधनकारक चिन्हे, माहितीदर्शक फलक, सावधानता दर्शक चिन्हे व सर्व आवश्यक उपाययोजना केली आहे.
(४) अस्तित्वातील पुलाची रुंदी तसेच भविष्यातील वाढणारी वाहतुक लक्षात घेऊन सद्य:स्थितीत असलेल्या पुलाच्या समांतर नवीन पुल निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिचवड महानगरपालिकेतील जाहिरात होर्डिंग बोर्डचे स्ट्रक्चरल ऑडिट करणेबाबत**

**(२२) ७१५८९ (०१-११-२०२३). श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उत्पन्न वाढीसाठी आकाश चिन्ह परवाना विभागामार्फत शहरात जमीन, इमारती आणि बांधकामावर जाहिराती उभारण्यासंदर्भात नियमावली होर्डिंग पॉलिसी तयार करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अधिकृत आणि अनधिकृत होर्डिंग स्ट्रक्चरचे महानगरपालिकेच्या स्थापनेपासून स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले नसल्याची धक्कादायक बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शहरातील सर्व प्रकारच्या अधिकृत होर्डिंगचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत शासन स्तरावर काय कारवाई करण्यात आली आहे,
(४) तसेच शहरात राजकीय लागेबांधे व दबावामुळे अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकांवर कारवाई करून शहराचे सौंदर्य अबाधित राखण्याकरिता शासनामार्फत कारवाई करण्याबाबत विहित कालमर्यादा आखण्यात आली आहे काय,
(५) तसेच आर्थिक हितसंबंध जोपासत अनधिकृत जाहिरात फलक होर्डिंग ज्या क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत अनधिकृतपणे उभारण्यात आले आहेत तेथील संबंधित आकाशचिन्ह परवाना विभागातील अधिकाऱ्यांची चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबत तसेच महानगरपालिकेकडून जाहिरात धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता सक्षम यंत्रणा उभारणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे,

महाराष्ट्र शासन राजपत्र, अधिसूचना दिनांक ९ मे २०२२ अन्वये लागू करण्यात आलेल्या होर्डींग पॉलिसी नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कामकाज चालते. त्यापुर्वी महानगरपालिकेने केलेल्या होर्डींग पॉलिसी नुसार कामकाज चालत होते.
(२) हे खरे नाही.

पिंपरी चिंचवड महापालिका शहरातील अधिकृत होर्डींग स्ट्रक्चरचे दरवर्षी नुतनीकरण करताना संबंधित व्यवसायीकांकडून होर्डींगजच्या स्ट्रक्चर स्टॅबिलिटी सादर करणे बंधनकारक आहे. त्याखेरीज नुतनीकरण करण्यात येत आहे.
(३) स्ट्रक्चर स्टॅबिलिटी सादर करताना ती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत पॅनलवरील इंजिनिअर कडूनच घेण्यात येते. शहरातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चर स्टॅबिलिटी घेणेत आलेली आहे. ज्यांनी ती सादर केली नाही असे सर्व होर्डींग्ज निष्काशित करण्यात आलेले आहेत.

(४) पिंपरी चिंचवड महापालिका शहरातील सर्व अनधिकृत होर्डिंग्ज निष्काषित करण्यात आलेले आहेत. तसेच वेळोवेळी अनधिकृत होर्डिंग्ज निष्काषित करण्यात येतात.
(५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने निविदाद्वारे अनधिकृत होर्डिंग्ज निष्कासित करणेसाठी खाजगी ठेकेदारांची नियुक्ती जून २०२१ मध्ये केलेली आहे. संबंधित ठेकेदारांकडून सर्व अनधिकृत होर्डिंग निष्कासित करणेत आलेले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील राजीव गांधी प्राणी संग्रहालयातील वन्य प्राण्यांच्या जोपासनेमध्ये झालेला गैरप्रकार

**(२३) ७१६३१ (०६-०२-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्याच्या महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या राजीव गांधी प्राणी संग्रहालय, वन्य संशोधन केंद्राचे विद्यमान संचालक यांनी कर्तव्यात कसूर करुन वन्य प्राण्यांच्या जोपासनेमध्ये गैरप्रकार केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या संचालकांनी वन विभागाच्या परवानगी शिवाय दोन चौसंगा, दोन तरस यांना अनाथालयातून राजीव गांधी प्राणी संग्रहालयात हलवून त्यांचे बेकायदा प्रजनन करत मार्गदर्शक सूचनेनुसार जोपासना केली नसून वन्य प्राणी नोंदीमध्ये हेतुपुरस्पर तफावत आणि अनियमितता केली असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित संचालक यांनी त्यांच्या कर्तव्यात कसून तसेच प्राणी संगोपणात केलेल्या गंभीर स्वरूपाचा गुन्ह्यासंबंधात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) नाही, हे खरे नाही.
वन्यप्राणी अनाथालय हा राजीव गांधी प्राणी संग्रहालयाचाच भाग होता. तांत्रिक कारणास्तव प्राणी अनाथालयातील प्राणी, प्राणी संग्रहालयाच्या विलगीकरण कक्षात वेळोवेळी हलविले जाते, चौशिंगा व तरस हे प्राणी सुध्दा प्राणी संग्रहालयाच्या विलगीकरण कक्षात तात्पुरत्या स्वरुपात हलविले होते. प्राणी संग्रहालयात असेपर्यंत या प्राण्यांमध्ये प्रजनन होऊन उत्पती झालेली नव्हती. या प्राण्यांच्या नोंदीमध्ये हेतूपुरस्पर तफावत आणि अनियमितता केलेली नाही.
(३) सदर चौशिंगा व तरस हे प्राणी वनविभागाने राजीव गांधी प्राणी संग्रहालयातून अन्यत्र हलविले आहे. त्यामुळे या प्राण्यांबाबत पुढील चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता नाही. तसेच हे प्राणी राजीव गांधी प्राणी संग्रहालयामध्ये हस्तांतरीत करणेसाठी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांची दि.०८/१२/२०२३ रोजी परवानगी प्राप्त झालेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हवेली (जि.पुणे) तालुक्यात अनधिकृतपणे भुखंडाची विक्री सुरु असल्याबाबत

**(२४) ७१८६१ (१४-०२-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अनधिकृतपणे भूखंडांचे विकसन व त्यामध्ये अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यानुसार त्यांचे सर्व्हेक्षण करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये कारवाई करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रामध्ये हवेली सह इतर कार्यक्षेत्रामधील एकूण १५२ अनधिकृत प्लॉटिंगचा / विकसन कामांचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून एकूण ९६ अनधिकृत भूखंड विकासकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ (१) अन्वये नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (६) (अ) अन्वये नोटीशींचे अनुपालन न केल्यामुळे हवेली तालुक्यातील २, मावळ तालुक्यातील ४, खेड तालुक्यातील १ अशा एकूण ७ अनधिकृत प्लॉटधारक / विकांसकावर स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून १७ अनधिकृत विकांसकावर गुन्हे दाखल करण्याचे संबंधितांना आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये कारवाई करण्यात येते. सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण १८६ अनधिकृत विकास कामांचे सर्वेक्षण करण्यात आले असून १२३ अनधिकृत भूखंड विकसकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ (६) (अ) अन्वये नोटीशींचे अनुपालन न केल्यामुळे हवेली तालुक्यातील २, मावळ तालुक्यातील ४, खेड तालुक्यातील १३ अशा एकूण १९ अनधिकृत प्लॉटधारक/विकासकांवर स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून ३५ अनधिकृत विकासकांवर गुन्हे दाखल करण्याचे संबंधितांना आदेश देण्यात आले आहे. प्राधिकरणामार्फत ३ प्लॉटिंगमधील अंतर्गत रस्ते, साईट ऑफिस, सिमाभिंत, कमान व जाहिरात फलक यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या पदभरतीत झालेला गैरव्यवहार

**(२५) ७१८७७ (२८-०२-२०२४). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या ३० जागांकरिता पदभरतीची प्रकिया नियमानुसार राबविण्यात आलेली नसून या भरतीत स्थानिक आणि विदर्भातील उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात आले नसल्याने राज्याबाहेरील उमेदवारांची निवड करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उमेदवारांच्या शैक्षणिक कागदपत्रांमध्ये त्रुटी असतांनाही त्यांची निवड करण्यात आल्याने या भरती प्रकियेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२४-०४-२०२४) :** (१) शिक्षकीय पदाच्या नवीन आरक्षण धोरणानुसार बिंदुनामावली प्रमाणीत करुन एकूण ३० पदाकरीता दिनांक ०४.०२.२०२३ रोजी (क्रमांक ५०/२०२३) नव्याने जाहिरात प्रसिध्द

करण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार मोठ्या प्रमाणात, राष्ट्रीय पातळीवर प्रसिध्दी देण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मध्ये शिक्षकीय पदे भरतांना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याची कुठलीही तरतुद नाही. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दिनांक ११ एप्रिल, २०२२ मधील संवर्गनिहाय आरक्षण धोरणानुसार विषयनिहाय गुणवत्ता यादी तयार करुन, गुणवत्ता यादीतील उमेदवारांचा गुणवत्ता क्रमांक/प्राप्त गुण व प्रवर्ग विचारात घेऊन उमेदवार ज्या विषयासाठी पात्र ठरेल त्या विषयाच्या रिक्त पदावर उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे.

(२) भरती प्रक्रिया नियमानुसार राबविण्यात आलेली असून कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील शहर व उपनगरात अन्न व औषध प्रशासनाने हॉटेल तपासणी केल्याबाबत**

**(२६) ७२०९३ (२८-०२-२०२४). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या तपासणीत ९० टक्के हॉटेल दोषी असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी आढळून आलेल्या हॉटेल विरुध्द कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०९-०७-२०२४) :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनाने मुंबई शहर व उपनगरांमध्ये दिनांक ०१.०४.२०२३ ते ३०.०५.२०२४ या कालावधीत एकुण ५९८ हॉटेल व रेस्टॉरंटची तपासणी करण्यात आली आहे. त्यापैकी ५८२ आस्थापनांना तपासणी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत सुधारणा नोटीस देण्यात आली आहे. त्रुटींची पुर्तता न केलेल्या २६ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**औंध व रामवाडी (जि.पुणे) शहरात होर्डिंग उभारण्यासाठी अनधिकृतपणे वृक्षतोड केल्याबाबत**

**(२७) ७४४३८ (१७-०२-२०२४). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) येथील स्पाईसर चौकात महाराष्ट्र हॉटेलच्या समोरील व मागील बाजूंच्या वृक्षांची होर्डिंग उभारण्यासाठी अनधिकृतपणे वृक्षतोड केली असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे शहरातील रामवाडी येथील विमानतळ रस्त्यावर सर्वे नं ३०/७ब/१ या ठिकाणीही होर्डिंग उभारण्यासाठी अनधिकृत वृक्षतोड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्रीच्या वेळी वृक्ष तोडण्यास बंदी असतांना पुणे मनपा प्रशासनाने पुणे शहरातील नगर रोडवरील शास्त्रीनगर चौकातील ३४ वृक्षांची रात्रीच्या वेळी वृक्षतोड केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन अनधिकृत वृक्षतोड करणाऱ्या दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.

सदर ठिकाणी जाहिरात फलकासाठी कोणतीही वृक्षतोड करण्यात आलेली नाही. परंतु सदर ठिकाणी मुस्लिम कब्रस्तान असून आत येण्या जाण्याचे मार्गावरील झाडांच्या फांद्या छाटणेस परवानगी मागण्यात आलेली होती. त्यानुसार परवानगीत दोन झाडांच्या फांद्या छाटणेस परवानगी देण्यात आलेली होती. सदर ठिकाणी परवानगीपत्रा व्यतिरिक्त चार वृक्षांची अनाधिकृत वृक्षतोड केलेली असून संबंधिताविरूध्द कायदेशीर कारवाईची प्रक्रिया चालू आहे.

(२) हे खरे आहे.

सदर ठिकाणी जाहिरात फलक उभारणेसाठी अनाधिकृत वृक्षतोड करण्यात आलेली असून संबंधिताविरुध्द कायदेशीर कारवाईची प्रक्रिया चालु आहे.

(३) हे खरे नाही.

सदर ठिकाणी वृक्ष प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार परवानगीपत्राप्रमाणे पथविभाग, पुणे महानगरपालिका यांचेमार्फत पुणे-अहमदनगर रस्ता राष्ट्रीय महामार्ग असल्याने रस्त्यावरील वाहतूक कमी झाल्यावर सायंकाळनंतर वृक्ष काढण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(४) जाहिरात फलक उभारणेसाठी करण्यात आलेल्या अनाधिकृत वृक्षतोड प्रकारणी संबंधित जाहिरात कंपनी व जागा मालक यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर मागासवर्ग कल्याण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार ३६६ जागा सामाजिक न्याय विभागाकडून ओबीसी कडे वर्ग करण्याबाबत

**(२८) ७४५८४ (१७-०२-२०२४) श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ओबीसी समाजातील घटकांना न्याय देण्यासाठी तत्कालीन शासनाने २०१६ च्या शासन आदेशान्वये स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन केल्यानंतर सन२०१८ मध्ये ओबीसी कल्याण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार ओबीसी विभाग कार्यक्षमतेने चालवण्यासाठी एकूण ३७० जागा सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडून वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली असली तरीही वेळो वेळी मागणी करूनही सामाजिक न्याय विभागाने ओबीसी विभागाच्या मागणीकडे दुर्लक्ष व टाळाटाळ केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये ओबीसी कल्याण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार ओबीसी विभाग कार्यक्षमपणे चालवण्यासाठी विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील प्रस्तावित जांगापैकी मुख्य सचिव यांच्या उच्च स्तरीय समितीच्या बैठकीत ३६६ जागा सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडून वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली असतानाही फक्त पाचच अधिकारी या मंत्रालयात कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओबीसी मंत्रालयामध्ये आवश्यक असलेली व मंजूर करण्यात आलेली सर्व रिक्त पदे भरण्यात यावी अशी मागणी सामान्य नागरिक, सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशीत करुन त्याअनुषंगाने ३७० जागा सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडून ओबीसी विभागाकडे विनाविलंब वर्ग करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०९-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या दि.१३.०८.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडुन विविध संवर्गाची ३७० पदे या विभागाकडे वर्ग करण्यास मान्यता होती. तथापि, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ३७० पैकी २९४ पदे वर्ग करण्यास सहमती दर्शविल्याने उच्चस्तर समितीच्या दि.१७.०७.२०२० रोजीच्या बैठकीत प्राप्त मंजुरीनुसार

दि.१४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये २९४ पदे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागास आवश्यक कर्मचारी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मा. राज्य मंत्रिमंडळाच्या दि.२८.०६.२०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४.०७.२०२३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये दिलेल्या निदेशानुसार एकूण वर्ग करावयाच्या २९४ पदापैकी कनिष्ठ लिपिक व शिपाई संवर्गातील प्रत्येकी ७८ रिक्त पदे तसेच उर्वरित विविध संवर्गातील पदापैकी ५० टक्के प्रमाणे ७१ पदांवर प्रत्यक्ष कर्मचारी याप्रमाणे एकूण २२७ पदे इतर मागास बहुजन कल्याण विभागास वर्ग करण्यात आली आहेत.

(३) विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयासाठी मंजूर असलेली पदे भरण्याबाबत मागणी प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने सहाय्यक संचालक/ संशोधन अधिकारी/ प्रकल्प अधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब व कनिष्ठ लिपिकांच्या पदांना इतर विभागाच्या समकक्ष पदांचे सेवाप्रवेश नियम लागू करुन पदभरतीसाठी मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठविण्यात आले आहे. त्यापैकी कनिष्ठ लिपिक या संवर्गाच्या १०० पदांसाठी मुख्य परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन घेण्यात आली आहे.

(४) व (५) सामाजिक न्याय विभागाकडुन विविध संवर्गातील वर्ग होणाऱ्या २९४ पदापैकी आतापर्यंत त्या विभागाने २२७ पदे वर्ग केली असून उर्वरित पदे वर्ग करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला विनंती करण्यात येत आहे.

---

### पुणे महानगरपालिकेतील निकृष्ट दर्जाचे रस्त्यांचे काम करणाऱ्या संबधितांविरुद्ध कारवाई करण्याबाबत

**(२९) ७४६३० (१७-०२-२०२४). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेकडून सन २०२३ च्या पावसाळ्यापूर्वी लाईन सफाई, नाले, चेंबर, रस्त्यांवरील खड्डे दुरुस्तीच्या कामाकरीता २ हजार १०० कोटी रुपये खर्च करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी खर्च केल्यानंतरही पुणे शहरातील सर्व रस्ते दुरुस्तीसाठी आणखी किमान १ हजार कोटीचा निधी लागणार असल्याचे माहे ऑगस्ट २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पावसाळी कामे करूनही खराडी, विमाननगर, लोहगाव, कात्रज-कोंढवा रस्ता, बिबवेवाडी, सिंहगड रोड, धायरी नर्हे-मानाजीनगर भुयारी मार्ग, आंबेगाव, कोथरूड डेपो, सातारा रस्ता यासह अनेक ठिकाणी रस्त्यांना पावसाळ्यात नदीचे स्वरूप आले असून, अशाच पद्धतीच्या निकृष्ट पावसाळी कामांमुळे नागझरी नाल्याच्या बाजूस असलेल्या झोपडपट्टीतील नागरिकांच्या घरांमध्ये ड्रेनेजचे पाणी घरात जाण्याच्या घटना घडल्या हे ही खरे आहे का ?

(४) तसेच पुणे महानगरपलिका क्षेत्रातील कात्रज-कोंढवा रस्त्याचे प्रलंबित काम मार्गी लावण्यासाठी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री, आयुक्त, पुणे महानगरपलिका व इतर सर्व सबंधित यंत्रणासमवेत दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान पाहणी करुन आदेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत तसेच रस्ते दुरुस्त करण्यासह वाहतुकीची समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) अशंत: खरे आहे.

१) सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात पावसाळ्यापुर्व लाईन सफाई, नाले व मलवाहिनींची देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यासाठी एकूण ३९ कोटींची तरतूद उपलब्ध झालेली असून निविदा प्रक्रिया करून जागेवर कामे चालू आहेत.

२) नाला साफसफाई – एकूण तरतूद १२ कोटी.

३) पावसाळी लाईन साफसफाई-एकूण तरतूद १२ कोटी.

४) मलवाहिनींची देखभाल दुरुस्तीची कामे १५ कोटी.

५) सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये रस्त्यांवरील खड्डे दुरुस्ती करणे, चेंबर्स दुरुस्ती करणे तसेच दुभाजक व तदनुषंगिक दुरुस्तीची कामे करणे याकरिता क्षेत्रिय कार्यालय निहाय एकुण र.रु. १६ कोटीची तरतुद असून त्या अंतर्गत निविदा मागवून प्रत्यक्षात दुरुस्तीची कामे सुरु आहेत. तसेच रस्त्याच्या खराब भागाचे पुर्नडांबरीकरण करणे, क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत तसेच मुख्य कार्यालय अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे दुरुस्तीकरीता डांबरी माल पुरविणे याकरिता पुणे मनपाचा हॉटमिक्स प्लांट यंत्रणा कार्यान्वित करणे, डांबर व खडी खरेदी करणे, खड्डे दुरुस्तीकरीता पेव्हरसह लेबर यंत्रणा कार्यान्वित करणे इ. कामे करणेकरिता र.रु.९०.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच जेट पॅचर मशिनद्वारे नादुरुस्त रस्त्याचे क्षेत्र दुरुस्त करणे याकरिता र.रु.५.०० कोटी आणि अस्तित्वातील कॉंक्रीट रस्त्याची दुरुस्ती करणे याकरिता एकुण र.रु. २.०० कोटी अशी मिळून र.रु.११३.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीमधून रस्ते दुरुस्ती विषयक कामे सुरु आहेत.

(२) अशंतः खरे आहे.

१) शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी उपरोक्त नमुद प्रमाणे एकुण र.रु. ११३.०० कोटीची तरतुद सन २०२३-२४ चे अंदाजपत्रकात उपलब्ध असून त्याप्रमाणे प्रत्यक्षात जागेवर कामे सुरु आहेत.

२) या व्यतिरिक्त ज्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती आवश्यक आहे त्याठिकाणी पुणे मनपाने एकुण ५ पॅकेजेस निहाय १००.६८ कि.मी. लांबीकरिता एकुण र.रु. ३२९.१४ कोटीच्या निविदा अंतर्गत रस्त्यांची पुर्नडांबरीकरणाची कामे सुरु केलेली आहेत. या व्यतिरिक्त उर्वरीत दुस-या टप्प्यामध्ये एकुण ५४.९८ कि.मी. लांबीच्या रस्त्यांकरिता र.रु. १२९.६८ कोटीची तरतुद आवश्यक आहे.

(३) अंशत: खरे आहे,

१) तथापि पावसाळ्यामध्ये पाणी साठलेल्या ठिकाणांचा पाण्याचा निचरा करण्यात आलेला आहे.

२) तसेच कायम स्वरूपी उपाय योजना करणेसाठी यापूर्वी पुणे शहरातील एकूण नाला बेसिन २३ पैकी फक्त ४ नाला बेसिन मधील पावसाच्या पाण्याचा निचरा होणेसाठी कामे करून घेण्यास आलेली आहेत . उर्वरित कामे करणेबाबतची प्रक्रिया टप्प्या टप्प्याने चालू आहे. सध्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत (NDMA) केंद्र सरकार व राज्य शासनाकडून उपलब्ध झालेल्या निधीनुसार पुढील ३ वर्षात काही कामे पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) ८४ मी. रस्त्याच्या ताब्याची कार्यवाही सुरु असल्याने पुर्ण रस्ता रुंदी झालेली नाही. त्यामुळे काही प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे.

सदयस्थितीत शत्रुंजय मंदिर चौक ते खडी मशीन चौकापर्यंत पर्यायी रस्त्याचे विकसन करुन सदर ठिकाणी एकेरी वाहतुक करण्यात आलेली आहे. तसेच राजस सोसा. चौक ते शत्रुंजय मंदिर चौकापर्यंत तात्पुरते रस्ता दुभाजक बसविण्यात आलेले आहे. तसेच कात्रज कोंढवा रस्त्यावर वाहतुकीचे नियंत्रण करणेसाठी ५० ट्रॅफिक वॉर्डनची दररोजसाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. याशिवाय शक्य त्या ठिकाणी अस्तित्वातील रस्त्याची रुंदी वाढविण्यात आलेली आहे. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी दूर होऊन वाहतूक सुरळीत झालेली आहे. कामाच्या गुणवत्तेबाबत तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्यात आलेली असून त्यांचेमार्फत गुणवत्ता तपासणी करण्यात येते.

---

## पुणे महानगरपालिका हद्दीतील वाघोली येथील डीपी रोडच्या कामाबाबत

**(३०) ७४९३७ (१५-०२-२०२४). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरानजिक असणाऱ्या वाघोली येथील पुणे अहमदनगर रस्त्यावरील वाघोली येथे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होत असून त्याचा नागरिकांना व प्रवाशांना मोठया प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे–अहमदनगर रस्त्यावरुन विदर्भ मराठावाडयाकडे ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे असून वाघोलीमध्ये तासनतास वाहनांची रांगा लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खराडी जकात नाका पासून आव्हाळवाडी रोड-आयव्ही इस्टेट–बकोरी रोड-कटकेवाडी हा रस्ता झाल्यास वाहतुक कोंडी काही प्रमाणात कमी होणार असल्याने सदरचा डीपी रोड होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१), (२) व (३) अशंत: खरे आहे.

सदरचे वाघोली गाव नव्याने पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ झालेले असून, या गावाचा विकास आराखडा (डीपी) तयार करण्याचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आले असून आराखडा शासनाकडे मान्यतेसाठी सादर केलेला आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात सदर रस्त्यासाठी र.रू.५०.०० लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. वाघोली गावाचा विकास आराखडा मान्य झाल्यानंतर सदर रस्त्याची आखणी व भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून रस्ता सर्वकष विकसित करणेची कार्यवाही पुणे महानगरपालिकेकडून करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या सेवक वर्गाची सेवानिवृत्तीवेतन विषयक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ७५३०२ (१७-०२-२०२४). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये नोकरी करून निवृत्त झालेल्या ४९३ सेवक वर्गीय कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्तवेतन विषयक प्रकरणे प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदीर्घ काळ महानगरपालिकेमध्ये नोकरी करून निवृत्त झालेल्या सेवकांवर व त्यांच्या वारसांवर मनपाच्या ढिसाळ कारभारामुळे उपासमारीची वेळ आली आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सेवक वर्गाची सेवानिवृत्तीवेतन विषयक प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सेवानिवृत्त वेतन प्रकरणी वारसांकडून कागदपत्रांची पूर्तता न होण, वारसवाद, कोर्ट प्रकरणे, सातव्या वेतन आयोग वेतन निश्चीतीकरण, इत्यादी कारणास्तव सेवानिवृत्त वेतन प्रकरणे प्रलंबित राहतात.

(३) पुणे महानगरपालिकेच्या कामगार कल्याण विभागाकडून प्रलंबित सेवानिवृत्त वेतन प्रकरणी दरमहा आढावा घेण्यात येतो. त्यामध्ये सर्व कर्मचारी यांना सेवानिवृत्त वेतन प्रकरणे तातडीने निकाली काढण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येते. त्यानुसार माहे जानेवारी २०२४ अखेर १०४ व माहे जानेवारी २०२३ ते माहे जानेवारी २०२४ अखेर ७९६ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील नागरिकांना अन्नातून विषबाधा (फूड पॉयझनिंग) होत असल्याबाबत**

**(३२) ७५३२६ (२९-०२-२०२४). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात हॉटेल्ससह रस्त्यावरील फूड स्ट्रीट स्टॉलवाल्यांकडून स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघ्ान होत असल्याने नागरिकांना अन्नातून विषबाधा (फूड पॉयझनिंग) होण्याचे प्रकार आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, पुणे शहरात हॉटेल्स आणि फूड स्ट्रीट स्टॉल वाल्यांकडून अस्वच्छता होत असून अन्न व औषध प्रशासनाकडून याबाबत कारवाई केली जात नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोशी, (जि.पुणे) येथील कार्यालयात दैनिक लोकमतने दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास केलेल्या स्टिंग ऑपरेशन दरम्यान १२ वाजेपर्यंत अधिकारी कार्यालयात आलेले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (०९-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

पुणे शहरात माहे एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत अन्न व औषध प्रशासनामार्फत हॉटेल्ससह रस्त्यावरील फुड स्ट्रीट स्टॉल यांच्या एकूण १८४ इतक्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील कलम ३२ नुसार ९१ हॉटेल/रेस्टॉरंटला सुधारणा नोटिस पाठविण्यात आल्या आहेत व ०२ प्रकरणी परवाना निलंबित करण्यात आला आहे. हॉटेलमध्ये आवश्यक त्या ठिकाणी विश्लेषणासाठी ०७ नमुने घेण्यात आले असून सर्व नमुने प्रमाणित दर्जाचे घोषित झाले आहे. तसेच, तपासणीच्या अनुषंगाने कायद्यातील उल्लंघन झालेल्या ५५ पेढींना तडजोड करुन रु.५,१४,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

पुणे जिल्हयामध्ये अन्न् विषबाधेसारख्या घटना टाळण्यासाठी वारंवार हॉटेल्स आणि फुड स्ट्रीट स्टॉल यांच्या नियमितपणे तपासण्या करण्यात येतात.
(३) व (४) पुणे कार्यालयात कार्यरत अधिकारी/कर्मचारी संख्या ५० इतकी आहे. पुणे कार्यालयात दि. २५ ऑगस्ट २०२३ रोजी कार्यालयीन वेळेत एकूण १९ अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. पुर्वपरवानगीने क्षेत्रिय कामकाजासाठी गेलेल्या अधिकारी यांची संख्या २१ आहे. तसेच, पुर्व परवानगीने रजेवर असलेल्यांची संख्या ०९ आहे. कार्यालयीन वेळेनंतर (उशिरा) उपस्थित असलेल्यांची संख्या ०१ असून सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, दि. ३१ ऑक्टोबर १९९२ नुसार उशिरा हजेरी पट या नोंदवही (लेटमर्स्टर) मध्ये नोंद घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**वरुड व मोर्शी (जि.अमरावती) या तालुक्यातील वेगवेगळे बंधारे**
**देखभाल दुरुस्ती अभावी नादुरुस्त झाल्याबाबत**

**(३३) ७५७७४ (१७-०२-२०२४). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी विधानसभा मतदार संघ अतिशोषीत असल्यामुळे वरुड व मोर्शी (जि. अमरावती) या तालुक्यातील भुगर्भातील पाण्याची पातळी मध्ये वाढ होण्यासाठी त्यावर उपाय म्हणुन दोन्ही तालुक्यात सिमेंट बांध, कोल्हापुरी बंधारे अशा प्रकारे वेगवेगळे बंधा-याचे बांधकाम करण्यात आलेले असून सदर बंधारे देखभाल दुरुस्तीअभावी नादुरुस्त अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधारे नादुरुस्त असल्यामुळे क्षमते इतका बंधा-यामध्ये पाणीसाठा होत नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नादुरुस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती करुन तेथील नागरीकांना पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०४-०७-२०२४) :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

त्यामुळे सदर बंधाऱ्यामध्ये कमी पाणीसाठा होत आहे.
(३) सदर प्रकरणी नादुरुस्त असलेल्या बंधाऱ्यांची दुरुस्तीचे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत व त्यानुसार सदर कामांस अटल भुजल योजनेअंतर्गत निधी प्राप्त झालेला आहे व सद्यस्थितीत सदर कामांची निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असून जून २०२४ पुर्वी सदर कामे पुर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) सदर प्रकरणी कोणताही विलंब झालेला नाही.

---

**कचारवाडी, (ता. केज, जि. बीड) येथील पाझर तलाव क्र.०२ च्या निकृष्ट कामाबाबत**

**(३४) ७६५४४ (०८-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कचारवाडी (ता. केज, बीड) येथील पाझर तलाव क्र. ०२ चे माहे मे, २०२३ मध्ये दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम पूर्णपणे निकृष्ठ दर्ज्याचे करण्यात आले असून सदर तलावाची दुरुस्ती अंदाजपत्रकाप्रमाणे झालेली नसल्यामुळे सदर निकृष्ट कामाची चौकशी करून संबंधितावर कारवाई करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जलसंधारण मंत्री व जिल्हा जलसंधारण अधिकारी, बीड. यांच्याकडे दिनांक ४ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०४-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) उपविभागीय जलसंधारण अधिकारी केज यांनी चौकशी केली असून सदर काम तांत्रिकदृष्ट्या योग्य व गुणवत्तापुर्ण असल्याचा अहवाल दिला आहे.

---

**राहुरी (जि.अहमदनगर) तालुक्यातील मौजे मांजरी (खुदसरगाव, देवळाली प्रवरा , चांदेगाव) येथे तलाठी कार्यालय सुरु करणयाबाबत**

**(३५) ७७६१२ (१०-०२-२०२४). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) (जि.अहमदनगर) तालुक्यातील मौजे मांजरी (खुदसरगाव, देवळाली प्रवरा , चांदेगाव) येथे तलाठी कार्यालय मंजूर असूनही जागेअभावी अद्यापही त्याचे काम सुरू झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त तालुक्यातील सर्व गावांमध्ये शासकीय जागा उपलब्ध असून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकडे कायद्यानुसार विहित आहेत, अशा जागा सार्वजनिक हिताच्या कामासाठी उपलब्ध करण्याची तरतूद असूनही तहसीलदार, राहुरी यांनी या कामाकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलाठी, ग्रामसेवक व तहसीलदार राहुरी यांच्या संगनमताने अनेक गावातील शासकीय भूखंडावर अतिक्रमण करण्यात येऊन इमारती बांधण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासकीय मालमत्ता जतन (संरक्षण) करण्याची जबाबदारी असणारे व वैयक्तिक लाभासाठी कर्तव्यात कसूर करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०७-२०२४) :** (१) व (२) अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील मौजे मांजरी (खुडसरगांव,देवळाली प्रवरा, चांदेगाव) या तलाठी कार्यालयासह एकूण २४ तलाठी व ०२ मंडळ अधिकारी कार्यालयाच्या बांधकामासाठी जागा तलाठी कार्यालयासाठी मंजूर करण्यात आलेली आहे.

अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील मौजे मांजरी येथील जुन्या इमारतीचे निर्लेखन करुन सदर जागा तलाठी कार्यालयासाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे. तेथे पाया व कॉलमचे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. चांदेगाव येथेही जागा उपलब्ध झालेली असून तेथे बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे.

याशिवाय, खुडसरगांव येथील गट नं.१४ मधील जागेचाही ग्रामपंचायत खुडसरगांव यांच्याकडून तहसिलदार, राहुरी कार्यालयामार्फत ताबा घेण्यात आला असून सदर जागा बांधकाम करण्यास उपलब्ध झालेली आहे.

देवळाली प्रवरानगर येथील सि.टी.एस. क्र.३८ व ३९ मधील मंजूर जागेत नगर परिषदेच्या मालकीच्या जुन्या इमारतीचे निर्लेखन न झाल्याने देवळाली प्रवरानगर येथील तलाठी कार्यालयाचे बांधकाम सुरु झालेले नाही. तथापि, तहसिलदार, राहूरी यांच्यामार्फत मुख्याधिकारी यांच्याकडे सदर जागा उपलब्धतेकरीता पाठपुरावा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिकेच्या रुग्णालयात सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३६) ७७८६२ (१७-०२-२०२४). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ५० लाख लोकसंख्येमागे महापालिकेचे केवळ कमला नेहरू रुग्णालय आरोग्य सेवा पुरवण्याचा प्रयत्न करीत असताना डायलेसिस मशिन बंद असणे, पाणीटंचाई तसेच मनुष्यबळासह अनेक सुविधांची वाणवा असल्याने अनेकदा रुग्णांना ससून रुग्णालयात पाठविले जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमला नेहरू रुग्णालयात अनेक सुविधांचे खाजगीकरण झाल्यामुळे रुग्ण मोफत उपचारांपासून वंचित राहून अनेक गरीब व गरजू रुग्णांना आरोग्य सेवा मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या बाणेर व वारजे येथील रुग्णालयात आरोग्य सेवा देण्याचा महानगरपालिकेने निर्णय घेतला आहे परंतु या दोन रुग्णालयातील सेवा अद्याप पर्यंत निविदांच्या चक्रात अडकल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन रुग्णालयात सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

पुणे मनपा चे एकूण ७ डायलेसीस केंद्र असून या सर्व ठिकाणी अल्प दरामध्ये डायलेसीस सुविधा उपलब्ध आहे. केवळ कमला नेहरू रुग्णालय येथील १२ मशीन पैकी ७ मशीन ऑक्टोबर महिन्यामध्ये तांत्रिक बिघाडामुळे बंद होत्या.
(२) हे खरे नाही.

कमला नेहरू रुग्णालयामध्ये बाह्य रुग्ण विभाग, गरोदरमातांची तपासणी व उपचार व प्रसुती विभाग, लसीकरण, क्षयरोग विभाग, कुटुंब नियोजन विभाग, बाल रोग विभाग, बाल रोग अतिदक्षता विभाग इत्यादी सुविधा विनामुल्य पुरवल्या जातात अत्याधुनिक ह्दय रोग निदान उपचार, सिटी स्कॅन, एमआरआय अतिदक्षता विभाग व प्रयोगशाळेकडील काही तपासण्या अल्प दारामध्ये बाह्य यंत्रणेव्दारे उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

बाणेर व वारजे येथील रुग्णालयाची अल्प दरामध्ये बाह्य यांत्रणेव्दारे चालवण्यास देण्याची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कार्यादेश देण्यात आले आहेत. बाणेर येथील रुग्णालय येत्या २ महिन्यामध्ये कार्यान्वित होणार असून वारजे येथील मल्टीस्पेश्यालिटी हॉस्पिटल करिता जागा हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, बीड (जि.बीड) यांच्या ई-निविदा सूचना क्र.बी-१/२ सन २०२३-२४ बाबत

**(३७) ७९३५० (०९-०५-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (ता.शिरूर का., जि.बीड) येथील बाळापुर को.प.बं.२, पिंपळगाव मंजरा को.पं.ब.२, वानगाव को.प.बं.४, दहिफळ को.प.बं.१, दहिफळ को.प.बं.२, खडकी को.प.बं.१, रौळसगाव को.प.बं.२, साखरे बोरगाव को.प.बं.१, साखरे बोरगाव को.प.बं.२, शिरूर को.प.बं.२, कान्होबाचीवाडी को.प.बं.२, आर्वी को.प.बं.१० बाबतीत जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग बीड यांच्या कार्यालयाकडून ई-निविदा सूचना क्र.बी-१/२ नुसार कार्यवाही झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निविदेतील सदर गावातील स्थळ पाहणी होत असतांना अनेक गंभीर चुका झाल्याच्या निदर्शनास आलेल्या आहेत, तसेच या चुकांमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे व इतर बाबींचे देखील नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित गावकरी, ग्रामपंचाय व तेथील शेतकरी वर्ग तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित कार्यालयाकडे रितसर तक्रारीबाबत पत्रव्यवहार केलेला असूनही संबंधित कार्यालयाकडून तक्रारीची दखल अथवा शहानिशा आजतागायत झाली नसल्याने शासनाच्या प्रचलित नियमानुसार सदरील ठिकाणावरील पुन:श्च स्थळ पाहणी अहवाल व शेतकरी वर्गाचे नुकसान होऊ नये याबाबतची हमी त्रयस्त समितीच्या मार्फत केल्याशिवाय सदरील निविदेमध्ये पुढील सत्वर कार्यवाही होणे योग्य होणार नाही अशी मागणी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय राठोड (०४-०७-२०२४) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

स्थळांची निवड करताना शेतकऱ्यांचे शेतीचे व इतर बाबींचे नुकसान होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात आलेली आहे.

(३) याप्रकरणी संबंधित गावकरी, ग्रामपंचायत व तेथील शेतकरी वर्गाने तक्रार केल्याचे दिसून येत नाही. परंतू मा.विधानसभा सदस्य बीड यांच्या विभागाकडून ई-निविदा सुचना क्र.बी-१/२ नुसार कार्यवाही झालेल्या काही कामांबाबत तक्रार प्राप्त झालेली आहे.

(४) निविदेतील योजनांचे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सविस्तर सर्वेक्षणाअंती व्यवहार्यता तपासून अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीचे व इतर बाबींचे नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे. योजनांची निविदा कार्यवाही हाती घेण्यापुर्वी सक्षम स्तरावरून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.